( इंग्रजीमध्ये टंकलेखित केलेल्या न्याय निर्णयाचे मराठीमध्ये भाषांतर )

**सर्वोच्च न्यायालय अहवाल - (१९९६) १ एस. सी. आर - ११४३-११४६**

**फौजदारी अपिलीय अधिकारिता**

**फौजदारी अपिल क्र. ७०८/१९९५**

**ब्रिज पाल**

**विरुद्ध**

**राज्य (दिल्ली प्रशासन )**

**१ फेब्रुवारी, १९९६**

**( जी. एन. रे. आणि बी. एल. हंसारिया, न्यायमूर्ती )**

टाडा कायदा :

कलम .५—जिवंत काडतुसे असलेले अनधिकृत देशी बनावटीचे पिस्तूल सापडले - निष्पक्ष साक्षीदारांची अनुपस्थिती - प्रयत्न करूनही निष्पक्ष साक्षीदार मिळवता आले नाहीत - अशा परिस्थितीत, पोलिस अधिकाऱ्यांच्या जबानीत मतभेद होऊ नयेत - तरतुदीतील गृहीतक लक्षात घेता, अभियोग पक्षाने हे सिद्ध करण्याची गरज नाही की त्या व्यक्तीने अधिसूचित क्षेत्रात

जाणीवपूर्वक अनधिकृत शस्त्र बाळगले गेले होते आणि त्याचा वापर अतिरेकी किंवा विध्वंसक कारवायांसाठी करण्याचा हेतू होता - अशा वैधानिक गृहीतकाचे खंडन करील असा कोणताही पुरावा आरोपीने सादर केला नाही - म्हणून दोषी ठरतो आणि शिक्षेत हस्तक्षेप केला जात नाही.

अब्दुला पूचम्मा विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य, [१९८९] उपरोल्लेखित २ एससीसी १५२, उल्लेखनिय.

फौजदारी अपील अधिकार क्षेत्र : फौजदारी अपील क्रमांक ७०८/१९९५.

एफ.आय.आर. क्र. ३२६/१९९० मध्ये दिल्ली येथील पदनिर्देशित न्यायालयाच्या दिनांक ५.८.९४ च्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्यासाठी - कृपाल सिंग (ए.सी.)

उत्तरवादीसाठी - एस. एन. तेरडोल यांच्यावतीने एस. एन. सिक्का, बी. के. प्रसाद.

न्यायालयाने खालील आदेश पारित केला:

अपीलकर्त्याने दहशतवादी आणि विध्वंसक कारवाया (प्रतिबंध) कायद्याच्या (पुढे टाडा कायदा म्हणून संबोधले जाते) कलम १९ अंतर्गत हे अपील दाखल केले दिले आहे . ५.८.९४ रोजी च्या न्यायनिर्णयानुसार, दिल्ली च्या पदनिर्देशित न्यायालय क्रमांक ११ च्या विद्वान न्यायाधीशांनी अपीलकर्त्याला टाडा कायद्याच्या कलम ५ अंतर्गत दोषी ठरवले आहे आणि त्याला पाच वर्षे

सक्तमजुरी आणि ५०० रुपये दंड व दंड न भरल्यास आणखी १५ दिवस सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. उत्तर प्रदेशातील काही खुनाच्या घटनांमध्ये सहभागी असलेली, वाईट चारित्र्याची एक व्यक्ती धौला कुआं येथील लिबासपूर बसस्थानकावर काही अनधिकृत शस्त्रांसह उपस्थित असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी छापा टाकण्यासाठी त्यांची टीम स्थापन केली होती. झडती आणि जप्तीच्या कृतीसाठी  साक्षीदार होण्यासाठी त्यांनी काही लोकांशी संपर्क साधला, परंतु अशा व्यक्तीची झडती घेण्यासाठी आणि त्याच्याकडून मालमत्ता जप्तीसाठी कोणीही साक्षीदार होण्यास तयार न झाल्याने पोलिसांनी त्यानंतर पोलिस अधिकाऱ्यांच्या मदतीने छापा टाकला. लिबासपूर बसस्थानकावर घटनेच्या दिवशी दुपारी दीडच्या सुमारास अपीलकर्ता सापडला आणि त्या व्यक्तीची झडती घेतली असता पोलिसांनी एक जिवंत काडतुस भरलेले देशी बनावटीचे पिस्तूल आणि इतर दोन जिवंत काडतुसे जप्त केली. पोलिसांनी संबंधित पिस्तूल व एका काडतुसाचे मोजमाप करून स्केच मॅप तयार केला व संबंधित शस्त्र व काडतुसे सील करून पोलिस माल खाना यांच्याकडे पाठविली. संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक ती परवानगी मिळाल्यानंतर अपीलकर्त्याविरुद्ध टाडा कायद्याच्या कलम ५ अन्वये खटला दाखल करण्यात आला.

या प्रकरणी सरकारी पक्षाने हेड कॉन्स्टेबल सतीर सिंग (सरकारी साक्षीदार क्र, १) (स. सा.) जगदीश चंदर, उपनिरीक्षक (स.सा.क्र.२), एएसआय महिपाल सिंह (स.सा.क्र.३), एएसआय संतोख सिंह (स.सा.क्र.४), हेड कॉन्स्टेबल बलजीत सिंग (स.सा.क्र.५), कॉन्स्टेबल

रमेश कुमार (स. सा.क्र.६) यांची साक्ष नोंदविली आहे. स. सा.५ हा पोलिस माल खाना चा प्रभारी होता जिथे जप्त केलेले पिस्तूल आणि काडतुसे सीलबंद लिफाफ्यात ठेवण्यात आली होती आणि त्याने सीलबंद पार्सलमध्ये वरील वस्तू मिळाल्याची व बीटीपी युनिट, जुनी पोलिस लाइन येथील बॅलेस्टिक तज्ज्ञांकडे पाठवेपर्यंत त्या वस्तू सीलबंद लिफाफ्यात ठेवण्यात आल्या होत्या अशी साक्ष दिली आहे. आयुधिक याने अशीही साक्ष दिली आहे कि त्याने शस्त्रांविषयी प्रशिक्षण घेतले असून जप्त केलेल्या पिस्तूलातून जप्त केलेल्या काडतुसांपैकी एक काडतुस त्याने चालवून पहिले आणि त्यावरून पिस्तूल चालू अवस्थेत असल्याचे त्याला आढळून आले. या साक्षीदाराच्या साक्षीवरून फिर्यादी खटला संशयापलीकडे सिद्ध झाल्याचे निदर्शनास आल्याने विद्वान न्यायालयाने अपीलकर्त्याला टाडा कायद्याच्या कलम ५ अन्वये दोषी ठरवले आणि वरील शिक्षा सुनावली.

न्यायलयमित्र म्हणून अपीलकर्त्याची बाजू मांडणारे विद्वान वकील कृपाल सिंह यांनी सांगितले की, फिर्यादी खटल्यानुसार, अपीलकर्त्याला लिबासपूर बस स्थानक, धौला कुआं येथून अटक करण्यात आली. अभियोग खटल्यात आरोप केल्याप्रमाणे अपीलकर्त्याला पोलिसांनी त्या ठिकाणाहून पकडले होते आणि त्याच्याकडून हे पिस्तूल आणि काडतुसे जप्त केली होती हे सिद्ध करण्यासाठी पोलिस निष्पक्ष साक्षीदार मिळवू शकले असते, परंतु प्रस्तुत प्रकरणात पोलिस कर्मचाऱ्याची जबानी नोंदविण्यात आली. कोणताही निष्पक्ष, हितसंबंध नसणारा साक्षीदार उपलब्ध नसताना आणि केवळ पोलिस कर्मचारी साक्षीदारांच्या साक्षीवरून अपीलकर्त्याला

शिक्षा ठोठावायला नको होती. विद्वान वकिलांनी असाही युक्तिवाद केला की स. सा. क्र. २ ज्यास अयुधिक म्हणून तपासण्यात आले त्यास तज्ञ म्हणून समजता कामा नये आणि जर पिस्तूल योग्य त्या तज्ञाकडून तपासले गेलेले नसेल तर संशयाचा फायदा अपीलकर्त्यास दिला पाहिजे. विद्वान वकिलांनी पुढे असाही युक्तिवाद केला की अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की त्याला ह्या प्रकरणामध्ये खोटे गुंतवण्यात आले आहे कारण त्याला लिबासपूर बस स्टँड येथे अटक करण्यात आली नव्हती. त्याने असा युक्तिवाद केला की त्याला एका लक्ष्मण नामक व्यक्तीसोबत राणा प्रताप बाग येथे पोलिसांनी अटक केली होती, पण दुर्दैवाने अशा खटल्याची दखल विद्वान पदनिर्देशित न्यायालयाने योग्य प्रकारे घेतली नव्हती. त्याने असा युक्तिवाद केला की आपल्या केसच्या समर्थनार्थ त्याची चौकशी होऊ नये म्हणून पोलिसांनी लक्ष्मणची सुटका केली होती.

या खटल्यात दिलेली साक्ष आणि विद्वान न्यायाधीशांनी दिलेला निकाल आम्ही वाचला आहे. साक्षीदारांनी दिलेल्या सबळ पुराव्यांवरून, जे विसंगत किंवा विरोधाभासी नाहीत, फिर्यादी खटला सिद्ध झाल्याचे दिसून येते. आमच्या मते, विद्वान पदनिर्देशित न्यायालयाने योग्यच म्हटले आहे की या प्रकरणात केवळ पोलिस कर्मचारी यांची तपासणी केली गेली असल्याने त्यांची साक्ष फेटाळली जाऊ शकत नाही, विशेषत: जेव्हा सरकारी पक्षाचे विशिष्ट प्रकरण आहे की त्यांनी जनतेमधून स्वतंत्र साक्षीदार मिळविण्याचा प्रयत्न केला, परंतु असे स्वतंत्र साक्षीदार मिळविण्याच्या त्यांच्या प्रयत्नात ते अपयशी ठरले. प्रस्तुत खटल्यात

अपीलकर्ता  व्यक्तीकडून पिस्तूल व काडतुसे जप्त करण्यात आली असून ती व्यवस्थित सील करून घेतल्यावर ती सीलबंद अवस्थेत पोलिस माल खाना येथे जमा करण्यात आल्याचे पुराव्यांवरून सिद्ध झाले आहे. तज्ञांकडून तपासणीसाठी पाठवेपर्यंत अशी शस्त्रे शाबूत व सीलबंद अवस्थेत राहिली, अशी साक्ष माल खानाच्या प्रभारींनी दिली आहे. जेथवर तज्ज्ञांकडून या पिस्तुलाची तपासणी करण्याचा प्रश्न आहे, तर संबंधित तज्ज्ञाच्या जबानीवरून असे दिसून येते की, त्याने भोपाळ येथून तांत्रिक पात्रता व कवच तांत्रिक कौशल्याचे प्रमाणपत्र मिळवले होते आणि त्याला अग्निशस्त्रे व दारुगोळा तपासणी, तपासणी व चाचणीचा ही प्रदीर्घ अनुभव होता. आमच्या मते, संबंधित पोलिस कर्मचारी शस्त्रास्त्रांमध्ये निष्णात मानले पाहिजेत. या संदर्भात अब्दुला पोचम्मा विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य, [१९८९] पुरवणी २ एससीसी १५२ या खटल्यातील न्यायनिर्णयाचा सिंग यांनी आधार घेतला, ज्या प्रकरणातील वस्तुस्थिती या प्रकरणातील वस्तुस्थितीपेक्षा स्पष्टपणे वेगळी आहे. अब्दुलाच्या प्रकरणात आरोपींकडून ग्रॅनेड जप्त करण्यात आल्याचा आरोप सरकारी पक्षाकडून करण्यात आला होता, पण जप्त केलेली वस्तू एक ग्रेनेड होता का? याबाबत योग्य तज्ञांकडून तपासणी झाली नव्हती आणि ती वस्तू ग्रॅनेड होती या एएसआयच्या साक्षीवर अप्रत्यक्षपणे अवलंबून न राहता न्यायालयाने संशयाचा फायदा दिला. प्रस्तुत प्रकरणात, आरोपींच्या ताब्यातून जप्त करण्यात आलेल्या पिस्तूलातील एक काडतुसही अयुधिक याने प्रत्यक्षात चालवल्याचे आम्ही या अगोदरच नमूद केले आहे .

या प्रकरणात शस्त्र आणि दारुगोळा जाणीवपूर्वक बाळगण्याचा घटक सिद्ध झालेला

नाही, असा युक्तिवादही अपीलकर्त्याच्या वकिलांनी केला आहे. आम्ही एवढेच सूचित करू शकतो की, अपीलकर्त्याच्या बाबतीत असे नाही की त्याला त्याच्या पॅंटच्या खिशात उपरोक्त दारुगोळा आणि शस्त्रे असल्याची माहिती नव्हती किंवा कोणीतरी त्याच्या नकळत ते साहित्य गुपचूप ठेवले होते. उलट या प्रकरणात त्याला खोट्या पद्धतीने अडकवण्यात आल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे होते. टाडा अंतर्गत अधिसूचित क्षेत्रात एखाद्या व्यक्तीकडे जाणीवपूर्वक कोणतेही शस्त्र किंवा दारूगोळा असल्याचे आढळल्यानंतर टाडा कायद्याच्या कलम ५ अन्वये अशा वस्तूंचा वापर दहशतवादी आणि विध्वंसक कारवायांसाठी करण्याचा हेतू असल्याचा वैधानिक अंदाज संजय दत्तच्या प्रकरणात या न्यायालयाच्या घटनापीठाच्या निर्णयात नोंदविला गेला आहे. त्यामुळे अधिसूचित क्षेत्रात अनधिकृत शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तीचा खरोखरच दहशतवादी किंवा विध्वंसक कारवायांसाठी वापर करण्याचा हेतू होता, हे सिद्ध करण्याची सरकारी पक्षाला गरज नाही. अशा वैधानिक गृहीतकाचे खंडन करणारा कोणताही पुरावा आरोपींनी दिलेला नाही. उपरोक्त परिस्थितीत खालील न्यायालयाच्या निर्णयात ढवळाढवळ करण्याचे कोणतेही कारण आम्हाला दिसत नाही. त्यामुळे अपील फेटाळले जाते.

जी.एन. अपील फेटाळले .

## <u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x**